# प्रकरण दोन

## भारतातील स्त्रीशिक्षणाचा संक्षिप्त इतिहास

२.१ प्रास्ताविक

२.२ वैदिक काळातील स्त्रीशिक्षण

२.३ सूत्र व स्मृतीकाळातील स्त्रीशिक्षण

२.४ पौराणिक काळातील स्त्रीशिक्षण

२.५ मध्ययुगीन स्त्रीशिक्षण

२.६ स्वातंत्र्यपूर्व ऐतिहासिक काळातील स्त्रीशिक्षण

२.७ स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीशिक्षण

२.८ समारोप

## २.१ प्रास्ताविक :

प्रगतीशील राष्ट्राला पुन्हा पुन्हा प्रत्येक क्षेत्रातील आपल्या वाटचालीचे सिंहावलोकन करावे लागते. स्त्रीशिक्षण हे समाजाच्या जिव्हाळ्याचे आणि राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असे एक क्षेत्र आहे.

मनुच्या ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' या वचनापासून ते ' यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता: । ' या विचारापर्यन्तची वाटचाल पाहिली तर दुर्दैवाने असेच म्हणावे लागते की गेली अनेक शतके स्त्री अनेक अर्थाने दास्यत्वाच्या अंधारातून वाट काढीत चालली आहे. परंतु स्त्री देखील एक मनुष्यच आहे. तिला मन आहे, विचार आहे, भावना आहेत या सर्व गोष्टींचा अनेकांना अनेक शतके विसरच पडलेला होता. पिढयानुपिढया स्त्रीकडे एक ' उपभोग्य वस्तु ' किंवा ' रक्षणाची वस्तु ' म्हणून पाहिले जावे व सर्व नीतिनियमांच्या बंधनात तिला जखडून ठेवण्यात पुरुषप्रधान समाजाने समाधान मानावे ही देशाचीच शोकांतिका आहे असे म्हणावे लागेल .

शिक्षण हा सर्व सुधारणांचा पाया आहे, समाजपरिवर्तनाचे साधन आहे हे ओळखून अनेक समाजसुधारकांनी स्त्रीशिक्षणास चालना दिली. भारतातील स्त्रीशिक्षणाच्या वाटचालीचा मागोवा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

प्रस्तुत शोधप्रबंध मुलींच्या शिक्षणविषयक समस्यांशी संबंधित असल्यामुळे या शोधप्रबंधाला पार्श्वभूमी म्हणून मुलींच्या ( म्हणजेच स्त्रियांच्या) शिक्षणाची वाटचाल कशी झाली हे पाहणे गरजेचे ठरते. सबब प्रस्तुत प्रकरणात भारतातील स्त्रीशिक्षणाचा वैदिक कालापासून तो

आजपर्यन्तचा व अगदी धावता, संक्षिप्त आढावा पुढील परिच्छेदातून घेण्यात आलेला आहे.

२.२ वैदिक काळातील स्त्रीशिक्षण :

सुमारे चार ते पाच हजार वर्षांपूर्वी भारतात आर्य लोकांनी प्रवेश केला. आर्य लोकांची संस्कृती त्या काळात फारच पुढारलेली होती. त्यामुळे भारतात पूर्वीपासून राहणाऱ्या जमातींवर त्यांनी आपले वर्चस्व गाजवले. त्यांना दक्षिणेकडे रेटले व उत्तरेकडील गंगायमुनेच्या सुपीक खोऱ्यात आर्यांनी वस्ती केली. याच काळाला वेदकाल असे म्हणतात. त्याकाळच्या जगातल्या इतर अनेक संस्कृतींहून आर्यांची संस्कृती श्रेष्ठ दर्जाची होती.

वैदिक काल हा स्त्री जीवनाच्या सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीने सुवर्णाक्षरांनी लिहिण्याजोगा होता असे तत्कालीन ग्रंथांवरून दिसून येते. त्या वेळच्या स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समाजामध्ये व स्वगृही मान दिला जाई. मुलांच्याप्रमाणेच मुलींच्याही मुंजी होत. ज्ञानप्राप्तीची सर्व साधने खुली असत. यज्ञप्रसंगी पतीबरोबर त्याची पत्नीही व्रतस्थ असे. आपल्या घरामध्ये एखादी विद्वान मुलगी असणे ही गोष्ट स्वाभीमानाची तशीच प्रतिष्ठेचीही मानली जाई.[१]

काही सुसंस्कृत घराण्यामध्ये एखादी अविवाहित अशी विद्वान स्त्री असेल तर तिच्या रूपाने घरात साक्षात लक्ष्मीच वावरत आहे असे मानण्यात येई.[२]

वनवासानंतर स्वगृही परतलेल्या रामाच्या स्वागतासाठी विद्वान मुलींची निवड आवर्जून केली गेल्याचा उल्लेख सापडतो.

आर्य लोकांच्या स्त्रिया अनेक बाबतीत पुरूषांच्या बरोबरीने हक्क उपभोगत होत्या. बालविवाह रूढ नव्हते. मुलींचे लग्नाचे वय सामान्यत: सोळा वर्षांचे होते. तोपर्यन्त मुलींनाही शिक्षण मिळत असे. गुरूकडे जाऊन त्या विद्या ग्रहण करीत असत.

वैदिक वाङ्.मयातून अध्ययनाचे बाबतीत स्त्रिया आणि पुरूष असा भेदभाव केलेला आढळून येत नाही.[3] ब्रम्हचर्य व वेदाध्ययन यांच्या साहाय्याने मुलगी अनुरूप पती प्राप्त करून घेत असल्याचा महत्वपूर्ण उल्लेख अथर्ववेदामध्ये आढळतो.[४]

हारीताच्या म्हणण्याप्रमाणे त्यावेळच्या स्त्रियांच्यामध्ये ब्रम्हवादिनी आणि सद्योवधू असे दोन प्रकार आढळून येत. ब्रम्हवादिनी स्त्रिया या ज्ञानग्रहण करणाऱ्या व साधना करणाऱ्या अशा असत. सद्योवधूंच्या बाबतीत विवाह ही घटना आवश्यक मानली जाई. यज्ञास आहुती देणे, वेदाध्ययन करणे, आप्तेष्टांच्या घरात भिक्षा मागणे या गोष्टींची ब्रम्हवादिनींना परवानगी असे. सद्योवधूंचे अध्ययन वयाच्या १६ वर्षांपर्यन्त चाले.

बौध्दिकदृष्टया ब्रम्हवादिनींनी फारच उल्लेखनीय प्रगती केल्याचे आढळून येते. पूर्वमीमांसाशास्त्र हे रूक्ष आणि किचकट आहे. परंतु त्यामध्ये अनेक स्त्रियांनी रस घेतला व त्यासंबंधी लेखन केले. वेदकालीन यज्ञयागादींच्या विरूध्द दिशेने विचार करणाऱ्या या शास्त्रास तत्वज्ञानाची बैठक लाभून ज्यावेळी लोकप्रियता लाभली त्यावेळी (ख्रि.पू. ८ वे शतक) स्त्री-शास्त्रज्ञही मागे पडल्या नाहीत.

पेहरावातील नाविन्य अगर दागिन्यातील सौंदर्य शोधत बसण्यापेक्षा मैत्रेयीला अमरत्वाकडे नेणाऱ्या विचारप्रणालीसंबंधी ओढ होती. ती याज्ञवल्क्याशी ज्ञात आणि अज्ञात याविषयी तासनतास वादविवाद करायची.

मुंडक उपनिषदात (१.१.५) उल्लेखल्या गेलेल्या वेदांगांचाही म्हणजे शिक्षणा, उच्चार व पाठांतराचे शास्त्र यांचा स्त्रिया अभ्यास करीत असत. कल्प (वैदिक विधी करण्याचा प्रकार) निरुक्त (शब्दांची व्युत्पत्ती सांगणारे शास्त्र) व्याकरण, छंद, ज्योतिष इत्यादींचा वेदांगात समावेश होतो.

वेदांतील काही ऋचा स्त्रियांनी लिहिल्या आहेत. वेदाच्या पाचव्या मंडलातील विश्ववारेची रचना व दहाव्या मंडलातील घोषाची रचना विशेष उल्लेखनीय आहे. लोपामुद्रा, राची, रोमशा, इन्द्राणी या स्त्री लेखिका होत्या. उपनिषदांमध्येही गार्गी, मैत्रेयी, सुलभा, अरुंधती, वाचक्नवी, सुवर्चसा इत्यादींची नावे आढळतात. त्यांच्या लेखनातून स्वतंत्र विचारसरणी, रचनाचातुर्य, माधुर्य, लालित्य हे गुण आढळतात.

स्त्रियांना संगीत, नृत्य इत्यादींचे शिक्षण दिले जाई.

स्त्रिया वैदिक विधीच्यावेळी मंत्रपठनामध्ये मोठया प्रमाणावर भाग घेताना दिसून येत.

राजघराण्यातील व त्या घराण्याशी संबंधित स्त्रियांना युध्दकला-विषयक शिक्षण दिले जात असे. ऋग्वेदातील घोषेच्या सुक्तामध्ये (१०.३९.४०) दोन स्त्री योध्दांचा उल्लेख आढळतो. पाचव्या मंडलामध्येही एका शशीयसी नावाच्या आर्य योध्द्या स्त्रीचा उल्लेख आलेला आहे. (ऋग्वेद ५.६१.६.९)

त्यावेळच्या समाजातील कित्येक सुशिक्षित स्त्रिया अध्यापकाचे काम करीत असत. त्यांना उपाध्याय्रा म्हणत. उपाध्याया म्हणजे आजची अध्यापिका होय.

२.३ सूत्र व स्मृतिकालातील स्त्रीशिक्षण :

वैदिक काळातील परिस्थिती स्मृतिकालामध्ये बदलत गेली. ज्ञान संपादनाचे काम मागे पडत जाऊन स्त्रियांना परिस्थितीनुसार काही कडक बंधने पाळावी लागली. गृहकृत्यास प्राधान्य देणे भाग पडले. वेदाध्ययनाची आणि उच्च शास्त्रातील अध्ययनाची सवलत स्त्रियांना ठेवली जाऊ नये असा विचार रूढ होत गेला. एवढेच नाही तर कायदाविषयक ग्रंथात आणि धार्मिक वाङ्.मयात कोणताही आधार नसलेल्या जाचक गोष्टी त्यांच्यावर लादल्या जाऊ लागल्या. अध्ययनासाठी बंदी घातली गेली. बालविवाह प्रचारात आले. वाडवडिलार्जित संपत्तीमधील हक्क नाहीसा झाला. सती जाण्यास उत्तेजन मिळत गेले. त्यामुळे भारतीय स्त्रीजीवन काळवंडत गेले. कौमार्यात पित्याने, तारुण्यात पतीने, वार्धक्यात पुत्राने स्त्रीचे रक्षण करावे, तिला जन्मभर कोणाचे ना कोणाचे तरी संरक्षण दिले जावे, हा मनूचा विचार रूढ होत गेला.

२.४ पौराणिक काळातील स्त्रीशिक्षण :

पुराणांचा काल हा थोडासा वादग्रस्त प्रश्न आहे. तथापि बहुसंख्य जाणकारांनी हा काल इ.स. पूर्व २०० ते इ.स. १३००-१४०० हा धरलेला आहे.

पुराणकाळात स्त्रियांचे शिक्षण पूर्वीप्रमाणे पण घरीच होत असे. तथापि काळ बदलला व सर्वच गोष्टी बदलल्या. पूर्वी यज्ञकर्मात भाग घेणारी स्त्री आता सहभागी होईनाशी झाली. कारण तिच्यावर बंधने लादली गेली. समाजाला मुलीने बराच काळ अविवाहित राहणे रुचेनासे झाले. स्मृतिंनी तर आठव्या वर्षापर्यन्त मुलींचे विवाह झालेच पाहिजेत हा दंडक घातला आणि तोच आचारधर्म पुराणात स्वीकारलेला आहे, असे अनेक पौराणिक आख्यानांवरून आपणास म्हणता येईल.[५]

' ब्राह्मण आपले तत्वज्ञान स्त्रियांस शिकवित नाहीत ' असे मॅगॅस्थिनीसने म्हटले आहे. त्यावरून इ.स. पूर्व २५० च्या सुमारास स्त्रियांचे अध्ययन संपुष्टात आले असे दिसते.[६]

पुराण वाङ्.मयात मैत्रेयी, गार्गी, सुलभा, यांच्यासारख्या अध्ययन केलेल्या स्त्रियांची वर्णने नाहीत. शिक्षणासाठी स्त्रियांनी बरीच वर्षे अविवाहित राहावे ही कल्पनाच मुळी समाजाने टाकून दिलेली होती. तत्कालीन राजकीय परिस्थिती या गोष्टीला कारण असावी. गरीब घराण्यातील मुलींच्या प्राथमिक शिक्षणाचीही हेळसांड होऊ लागली.

कुलीन, संपन्न आणि सुसंस्कृत घराण्यात मात्र, मुलींचे वेदाध्ययन बंद पडल्यावरही त्यांचे वाङ्.मयीन व कलात्मक शिक्षण चालू राहिले. इ.स. नंतर २०० ते ४०० पर्यन्तच्या काळात विवाहाची कालमर्यादा साधारणपणे १२-१४ वर्षे होती. अर्थात तोपर्यन्त मुलींना लेखन, वाचन वगैरे शिकवून थोडीशी वाङ्.मयाचीही व ओळख करून देत. या काळात स्त्रिया प्राकृत भाषांचा विशेष अभ्यास करीत. पुढे संस्कृतचे विशेष अध्ययन सुरू झाल्यावर संस्कृतमध्येही स्त्रियांनी कविता केल्या आहेत.

इ.स. च्या नवव्या शतकापर्यन्त संपन्न आणि सुसंस्कृत घराण्यातील स्त्रियांना उच्च शिक्षण देत असत, असे काव्यमीमांसेवरून ध्यानी येते. या शिक्षणात संगीत व नृत्य यांचा विशेष समावेश होता. परंतु यावरून बहुसंख्य स्त्रिया सुशिक्षित होत्या असे अनुमान काढता येत नाही. उलट नवव्या किंवा दहाव्या वर्षी मुलींची लग्ने होऊ लागल्यापासून ब-याचशा मुली अशिक्षित राहू लागल्या. त्या काळात शेकडा १० इतक्या तरी मुली साक्षर होत्या की नाही असे वाटू लागते.[७]

## २.५ मध्ययुगीन कालखंडातील स्त्रीशिक्षण :

पुराणांच्या नंतरचा बराचसा काल असा गेला की, स्त्रियांच्या शिक्षणासंबंधीचा मागमूसही कोठे लागू नये. या दीर्घ कालामध्ये स्त्रियांचे शिक्षण ही बाबच मुळी कुणाच्या फारशी लक्षात आली नाही. उलट यासंबंधात समाजामध्ये रूढी अनास्था माजलेली होती की, लिहायला वाचायला शिकविलेली मुलगी ही बालवयातच विधवा होईल असा अपप्रचार सुरू झाला. निरक्षरता वाढविणाऱ्या या विचारसरणीचा पुढे पुढे रूढा विपर्यास झाला की, अठराव्या शतकाचे आसमास शंभरात एखादीही स्त्री साक्षर दिसू नये.

जेव्हापासून स्त्रियांच्या शिक्षणाकडे समाजाने कानाडोळा करण्यास सुरुवात केली तेव्हापासून स्त्रिया ह्या जशा निरक्षर राहात गेल्या तशाच त्या भोळ्या आणि श्रध्दाळूही बनत चालल्या. ही गोष्ट हळूहळू एवढया पराकोटीला गेली की, आम्हाला पण पुरूषांच्याप्रमाणे स्वतंत्र अस्तित्व आहे हे सिध्द करून देण्यासाठी स्त्रियांना खास प्रयत्न करावे लागले.

परंतु शिक्षणाच्या दृष्टीने अंधारयुग ठरलेल्या या काळातही स्त्रियांनी आपली संस्कृती सोडली नाही. लेखन-वाचनाच्या दृष्टीने जरी त्या मागासलेल्या राहिल्या तरी गावातील देवालयांचेमधून पुराणिकबुवांनी केलेली कीर्तने व प्रवचने त्यांनी काळजीपूर्वक ऐकली, लक्षात घेतली, पाठ करायचा प्रयत्न केला आणि केवळ स्मरणशक्तीच्या आधारावर त्यांनी आपल्या बुध्दीचा विकास होईल हे पाहिले. त्यामुळे वडिलार्जित अशा पारंपारिक संस्कृतीच्या रक्षणाचे व संवर्धनाचे महत्वाचे काम त्यांच्याकडून आपातत:च केले गेले.

पुरुषांच्याप्रमाणे लिहायला-वाचायला शिकणे जरी जमले नाही तरी सामान्य स्त्रियांनी आपल्या जवळच्या कलाविषयक अभिरुचीचा आविष्कार रांगोळी, चित्र, भरतकाम, विणकाम, शिवणकाम इत्यादी ललितकलांच्या माध्यमातून केला.

भागवत धर्माचे प्रवर्तक ज्ञानदेव आणि त्यांचे बंधू निवृत्तिनाथ व सोपानदेव यांच्याबरोबर सतत राहिलेल्या मुक्ताबाईने आपला आध्यात्मिक दर्जा उंचाविला होता. मात्र तिच्या शिक्षणासंबंधीचा प्रत्यक्ष उल्लेख कोठे आलेला दिसत नाही.

मुसलमानांच्या स्वाऱ्या आणि अंमल भारतवर्षात सुरु झाल्यापासून स्त्रियांच्या सामाजिक जीवनाला उतरती कळा लागली. कित्येक घरांतून गोषा आला आणि उजळ माथ्याने समाजात वावरण्याची मोकळीक स्त्रियांना राहिली नाही. त्यामुळे समाजाच्या सांस्कृतिक आणि राजकीय जीवनातही अस्वस्थता निर्माण झाली. स्थलांतराचे प्रसंग आल्या कारणाने आर्थिक परिस्थितीसही धक्का पोहोचला. त्यामुळे स्वाभाविकच स्त्रीजीवनाची व स्त्रियांच्या शिक्षणाचीही आबाळ होत गेली.

रझिया बेगम व चांदबिबी या स्त्रिया असल्या तरी त्यांची कर्तबगारी कोणत्याही बाबतीत पुरुषांच्या मानाने कमी पडली नव्हती. त्यांच्या व्यक्तिगत शिक्षणासंबंधीचे स्पष्ट उल्लेख सापडत नसले तरी ऐने मकबरीमध्ये आलेल्या राजपुत्रांना व प्रत्येक विद्यार्थ्याला दिल्या जाणाऱ्या शालेय शिक्षणाचा उल्लेख या संदर्भात पाहणे उपयुक्त ठरेल. कारण या राजपुत्रांच्या बरोबरीने राजकन्यांनाही घरच्या घरी शिक्षण घेणे शक्य झाले असावे. त्याशिवाय राजकारणाचे धडे गिरविणे त्यांना शक्य झाले नसते.

राजमाता जिजाबाईसाहेब यांचा राजधुरंधर स्त्री म्हणून लौकिक मोठा होता. सामान्य स्त्रीजीवनावर त्यांच्या वागणुकीचा परिणाम फारच चांगला झाला. राजाराम महाराजांची राणी ताराबाई, थोरल्या महाराजांची राणी सकवारबाई व रामराजे यांची राणी या छत्रपतींच्या घराण्यातील स्त्रियांनाही लेखनकला अवगत होती असे म्हणण्यास बराच आधार उपलब्ध झाला आहे.

दरम्यानचे काळात रजपुतांच्या आणि जमीनदारांच्या मुलींना काही प्रमाणात लिहिता-वाचता येत होते.

अठराव्या शतकाच्या अखेरीस ललितकलांच्या विकासात खंड पडत गेला. संगीताचे शिक्षण देणारे शिक्षक हे वर्तनाने वरच्या दर्जाचे नसल्यामुळे हिंदू कुटुंबातून मुलींना संगीताचे शिक्षण देणे निषेधार्ह मानले गेले. तथापि रामायण महाभारत इत्यादी महाकाव्यांच्या श्रवणामुळे याही कालामध्ये हिंदू स्त्रियांनी आपला बहुश्रुतपणा कायम राखला आणि आपली उच्च प्रकारची संस्कृती टिकविली.

## २.६ स्वातंत्र्यपूर्व ऐतिहासिक काळातील स्त्रीशिक्षण :

शिक्षण संपादन करणे हा मानवी मूलभूत हक्कांपैकी एक महत्वाचा हक्क आहे. आंतरराष्ट्रीय संघटनेने त्याबाबतीत स्त्री-पुरुष समानता मान्य केली आहे. भारतीय राज्यघटनेतही तिला मान्यता मिळाली आहे. आज घटनेप्रमाणे भारतीय स्त्रीस ज्ञानमंदिराची सर्व दालने खुली झाली आहेत. ज्यांना हा हक्क जन्माबरोबर प्राप्त झाला आहे त्यांना तो किती मेहनतीने संपादन करावा लागला हे समजले तर त्याचे मोल लक्षात येईल. यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रीशिक्षणाचे सिंहावलोकन करावे लागेल.

इंग्रजांची राजवट सुरू झाली आणि भारतीय जीवनात विलक्षण क्रांती घडवून आणणारे बदल होऊ लागले. इ.स. १८२४ मध्ये अमेरिकेहून आलेल्या पाद्री मिशन-यांनी मुलींना शिकविण्यासाठी प्रथम शाळा काढल्या. १८३७-३८ मध्ये रेव्हरंड डॉ. विल्सन यानी मुंबईमध्ये कन्या शाळा स्थापन केली. पुण्यामध्ये याच सुमारास म. फुले यांनी नेत्रदीपक अशी कामगिरी केली. स्त्रीशिक्षणाचा कैवार घेऊन त्यांनी इ.स. १८५१ मध्ये खास मुलींच्या-साठी शाळा सुरू केली व स्वत: शिक्षकाचे काम केले. सावित्रीबाई फुले यांनी या कार्यात आपला मोलाचा सहभाग दिला.

इ.स. १८५४ मध्ये सर चार्लस वुड यांचा शिक्षणविषयक खलिता प्रकाशित झाला. या खलित्यामुळे स्त्रीशिक्षणाची वाढ करण्यासंबंधी सरकारी धोरणात बराच बदल घडून आला. इ.स. १८५७ मध्ये सरकारने ज्या शाळांमधून मुलींची हजेरी वाढत्या प्रमाणात दिसून आली त्या शाळांच्या मुख्याध्यापकांना बक्षिसे देण्याची योजना आखली. त्यावेळचे डायरेक्टर ऑफ एज्युकेशन श्री.ग्रँट व श्री. पाईल यांच्या प्रयत्नामुळे मुलींच्या एकूण १५९ शाळा स्थापन झाल्या. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभकाळात प्रकाशित झालेल्या ॲडमसाहेबांच्या जनगणना वृत्तांतामध्ये २१,९०७ पुरुषांमागे फक्त ४ साक्षर स्त्रियांचे प्रमाण आढळून आले.

राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नामुळे बंगालमधील शिक्षणाचे वातावरण बदलू लागले. लॉर्ड डलहौसीचे धोरण स्त्रीशिक्षणास पोषक होते. इ.स. १८५४ मध्ये स्त्रीशिक्षणाची जबाबदारी सरकारने अंगिकारीली.

इंग्लंडच्या प्रख्यात समाजकार्यकर्त्या मेरी कार्पेन्टर भारतात आल्या. त्यांनी वरच्या पातळीवरून स्त्रीशिक्षणाचा प्रश्न हाताळला. त्यामुळे १८७० साली पुण्याला आणि १८७१ मध्ये अहमदाबादला स्त्रियांचे प्रशिक्षण महाविद्यालय सुरू झाले.

नामवंत समाजसुधारक श्री. गोपाळ गणेश आगरकर यांनी स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार केला.

भारतीय शिक्षण आयोगाने (१८८२-८३) भारतीय समाजजीवनाचा आढावा घेतला. आणि स्त्रीशिक्षणाची वाटचाल काळजीपूर्वक झाली पाहिजे असे प्रतिपादन केले.

इ.स. १९११ मध्ये श्री. गोपाळ कृष्ण गोखले यांनी मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे झाले पाहिजे असे विधेयक वरीष्ठ कायदेमंडळापुढे आणले.[8]

पारतंत्र्य, जातीभेद या समस्या सोडविण्यासाठी शिक्षणाखेरीज दुसरा उपाय नाही याचा साक्षात्कार होऊ लागला. मुलांच्याप्रमाणे मुलींनाही शिक्षण मिळाले पाहिजे हा जणू या काळातील युगधर्म होऊन बसला व स्त्रीशिक्षणाची वाटचाल झपाटयाने सुरू झाली.

इ.स. १८८२ ते १९०२ या कालखंडाचे एक वैशिष्टय म्हणजे मुलींनी महाविद्यालयीन शिक्षणास प्रारंभ केला. १८८८ मध्ये कु. कार्नेला सोराबजी या लॅटिन विषय घेऊन पहिल्या वर्गात बी.ए. झाल्या.

लॉर्ड कर्झन यानी स्त्रीशिक्षणाच्या संदर्भात स्त्रीशिक्षकांची नेमणूक आणि मॉडेल स्कूलसची स्थापना या गोष्टींना प्राधान्य दिले.

२९ सप्टेंबर, १८८४ रोजी पुणे येथे सर जेम्स फर्ग्युसन यांच्या हस्ते 'हायस्कूल फॉर नेटिव्ह गर्ल्स' या संस्थेचे उद्घाटन झाले. कलकत्याच्या बेथ्यून हायस्कूल नंतर स्थापन झालेले हे माध्यमिक शिक्षण देणारे दुसरेच हायस्कूल होते.

सुशिक्षित स्त्री ही राष्ट्रविकासाच्या दृष्टीने पुरुषापेक्षाही अधिक उपयुक्त ठरते या विचाराने महाराष्ट्रात लोकहितवादी गोपाळराव देशमुख, महर्षी कर्वे, म. फुले, न्यायमूर्ती रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर,

लो. टिळक, गोपाळ गणेश आगरकर इत्यादी समाजसुधारकांचे प्रयत्न चालू होते.

इ.स. १९१६ मध्ये पुण्याला महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी ` विमेन्स युनिव्हर्सिटी ` स्थापन केली. मुलींना उच्च शिक्षण मिळाले पाहिजे अशी विचारसरणी स्वीकारली गेली व या नवीन उपक्रमाचे सर्वत्र स्वागतच झाले.

कलकत्ता विद्यापीठाने नेमलेल्या विद्यापीठ आयोगाने एक उपक्रम सुचविला होता. कलकत्ता विद्यापीठामध्ये एक स्वतंत्र असे ` स्पेशल बोर्ड ऑफ विमेन्स एज्युकेशन ` स्थापन करण्यात यावे ही सूचना करण्यात आली. होती. ज्या मुलींना पडदा पाळावा लागतो त्या हिंदू व मुसलमान जमातीतील मुलींच्यासाठी वेगळा अभ्यासक्रम तयार करून तो सहकारी तत्वावर आधारित अंमलात आणावा.

१९१३ मध्ये सरकारने एका खास ठरावाद्वारे धोरण जाहीर केले. त्यामध्ये स्त्रीशिक्षणविषयक अपेक्षा पुढीलप्रमाणे व्यक्त करण्यात आलेल्या होत्या.

१) मुलींना द्यावयाचे शिक्षण हे अधिक व्यावहारिक व समाजजीवनाशी मिळतेजुळते घ्यायला शिकविणारे असे असावे.
२) मुलांच्या शिक्षणामध्ये स्पर्धा उभी करणारे असे ते नसावे. तसेच ते केवळ परीक्षाप्रधानही असू नये.
३) आरोग्यशास्त्र व शालेय जीवन याबद्दल खास माहिती देणारे आर त्यासंबंधी आपले लक्ष केंद्रित करणारे असेही ते असावे.

४) शिक्षिकांच्या व तपासनीसांच्या जागी स्त्रियांचा उपयोग करण्यात यावा.

४) शाळेची वरचेवर तपासणी केली जावी व चालकांचा पूर्ण ताबा राहील अशी परिस्थिती सदैव तेथे दिसावी हे प्रामुख्याने पाहिले जावे.

येथे शिक्षणाबरोबरच समाजबांधणीचाही विचार केला गेला. सरकारच्या या उपक्रमामुळे त्यावेळी स्त्रीशिक्षणामध्ये सर्व थरातून चांगलीच प्रगती झाली आणि पुढच्या काळातील विकासाच्या पायाभरणीच्या दृष्टीनेही फायदा झाला.

१९२२ च्या सुमारास मुलांसाठी व मुलींसाठी वेगळा अभ्यासक्रम असावा याविषयी लोकांमध्ये चर्चा होऊ लागली. परंतु व्यावहारिक अडचणींमुळे ही गोष्ट प्रत्यक्षात यशस्वी झाली नाही.

लो. टिळक व म. गांधी इत्यादींनी स्वातंत्र्यलढ्यास सुरुवात केली. १९३१-३२ च्या सत्याग्रहात स्त्रियांनी बजावलेली नेत्रदिपक कामगिरी बघून महात्माजींची अशी खात्री पटली होती की, स्त्रियांचे अंगी एखादी अपूर्व कामगिरी पार पाडण्याचे प्रचंड सामर्थ्य आहे.

इ.स. १९३६ मध्ये सेंट्रल ॲडव्हायझारी बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या ` दि विमेन्स एज्युकेशन कमिटी ` ने स्त्रियांच्या प्राथमिक शिक्षणाचा विचार करताना असे सांगितले की, खेडयातील प्राथमिक शाळांमधून मुलींनी सहशिक्षण घेण्यास हरकत असू नये. मात्र जेथे मुलींची संख्या अधिक असेल तेथे मुलींसाठी स्वतंत्र वर्ग सुरू करण्यात यावेत. तसेच या कमिटीने स्त्रीशिक्षिकांच्या नेमणुकीवर भर देऊन मुलांमुलींच्या शाळांतून किमान दोन तरी स्त्रीशिक्षिका असाव्यातच असा आपला अभिप्राय व्यक्त केला.

१९२१ ते १९३७ च्या दरम्यानच्या काळातील स्त्रीशिक्षणाचा आढावा घेताना हरटॉग कमिटीने प्रकट केलेले निवेदन लक्षात घेण्याजोगे आहे. या कमिटीच्या वृत्तांताप्रमाणे १९३७ मध्येही अद्याप स्त्रीशिक्षण मागासलेपणातच मोडत होते. एकंदरीने लोकसंख्येच्या मानाने शाळेत जाणाऱ्या मुलींची संख्या केवळ २.३८ टक्के एवढीच होती आणि स्त्रियांच्यामधील साक्षरतेचे प्रमाण फक्त ३ टक्के होते.

भारतातून शिक्षणाकरिता परदेशी जाणाऱ्या पहिल्या महिला डॉ. आनंदीबाई जोशी व पंडिता रमाबाई या महाराष्ट्राच्या रहिवासी होत. सीताबाई भाजगांवकर या वकिलीची पदवी ईंग्लंडमधून घेऊन येणाऱ्या पहिल्या भारतीय महिला. म. गांधीजींच्या चळवळीनंतर शहरातील शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या संख्येत प्रचंड वाढ झाली. शिक्षणाच्या विविध क्षेत्रात त्या चमकू लागल्या. अनेक व्यवसायात त्यांनी अखिल भारतात मानाचे पहिले पान मिळविले. सिंधू गाडगीळ या पहिल्या वैमानिक, शैलजा साठे या पहिल्या स्त्री चार्टर्ड अकौंटंट, श्रीमती बापट पहिल्या पोलीस इन्स्पेक्टर, तर कु. परांजपे ही Meteorology विषयात परदेशी जाऊन डॉक्टरेटची पदवी मिळविणारी पहिली भारतीय व्यक्ती होय.[१]

१९४६-४७ मधील स्त्रीशिक्षणाची अवस्था पुढील सारणी क्रमांक २.१ व सारणी क्रमांक २.२ वरून दिसून येते.

## सारणी क्रमांक २.१

१९४६-४७ मधील स्त्रीशिक्षणाची अवस्था (जनरल एज्युकेशन)

| अ.नं. | शिक्षण संस्थांचे प्रकार (जनरल एज्युकेशन) | शिक्षण-संस्था | विद्यार्थिनी |
|---|---|---|---|
| १. | आर्टस् व सायन्स कॉलेजीस | ५९ | १७,६४८ |
| २. | हायस्कूल्स | ४७६ | १,७८,३४१ |
| ३. | मिडल स्कूल्स | १,१८७ | १,७७,७८४ |
| ४. | प्रायमरी स्कूल्स | १४,३३० | २८,३३,०९६ |

उगम : डॉ. बाबर, `स्त्रीशिक्षणाची वाटचाल,` पा.क्र.२२३

## सारणी क्रमांक २.२

१९४६-४७ मधील स्त्रीशिक्षणाची अवस्था (स्पेशल एज्युकेशन)

| अ.नं. | शिक्षणसंस्थाचे प्रकार | शिक्षण संस्था | विद्यार्थिनी |
|---|---|---|---|
| १. | व्होकेशनल व टेक्निकल कॉलेजीस | ३ | १,७६८ |
| २. | ट्रेनिंग कॉलेजीस | ११ | ६६० |
| ३. | ट्रेनिंग स्कूल्स | १८८ | १०,४८३ |
| ४. | इतर स्पेशल स्कूल्स | ५९४ | २७,८६४ |
| ५. | मान्यता न मिळालेल्या इतर संस्था | ५३७ | ४६,६०४ |
| | एकूण : | | |

उगम : स्त्रीशिक्षणाची वाटचाल, डॉ. बाबर, पा.क्र.२२४.

## २.७ स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीशिक्षण :

१५ ऑगस्ट, १९४७ या दिवशी भारत स्वतंत्र झाला. २६ नोव्हेंबर, १९४९ या दिवशी भारतीय जनतेने भारतीय संविधानाचा स्वीकार केला. या संविधानानुसार सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, वैचारिक आणि आविष्काराचे स्वातंत्र्य आणि समान संधीची ग्वाही देण्यात आली. त्यामुळे स्त्री व पुरूष याना समान अधिकार बहाल करण्यात आले.

आतापर्यन्तच्या सर्व पंचवार्षिक योजनांमध्ये स्त्रीशिक्षणाला गती यावी ह्या बाबीवर विशेष भर देण्यात आला.

स्त्रीने एक नागरिक, गृहस्वामिनी, माता, कुटुंबाच्या उत्पन्नात भर घालणारी व्यक्ती आणि नवीन समाजाचा आधारस्तंभ असा आपल्या सर्व भूमिका यशस्वीरीतीने पार पाडण्यासाठी सक्षम व्हावे, असा दृष्टिकोन यामागे आहे. मुलींनी शिक्षण अर्धवट सोडू नये तसेच ज्यांना औपचारिक शिक्षण घेता येत नाही त्यांना अनौपचारिक शिक्षणाच्या जास्तीतजास्त संधी मिळाव्यात ह्यासाठी प्रयत्न केले गेले.

पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यात मुलींच्या शिक्षणासाठीच्या तरतुदींमध्ये वाढ करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले.

१९५०-५१ ते १९८०-८१ या कालावधीतील पंचवार्षिक योजनेत मुलींच्या शिक्षणाची प्रगती कशी झाली हे पुढील सारणी क्रमांक २.४ वरून दिसून येते.

## सारणी क्र. २.३

### मुलींच्या शिक्षणाच्या प्रगतीची आकडेवारी
(१९५०-५१ ते १९८०-८१)

| योजना कालावधी | १ ते ४ इयत्ता मधील मुलींची संख्या (लाखात) | नावनोंदणी केलेल्या मुलींचे त्या वयोगटातील मुलींशी प्रमाण | ५ ते ७ इयत्तामधील मुलींची संख्या (लाखात) | नावनोंदणी केलेल्या मुलींचे त्या वयोगटातील मुलींशी प्रमाण | ८ ते १० इयत्तामधील मुलींची संख्या (लाखात) | नावनोंदणी केलेल्या मुलींचे त्या वयोगटातील मुलींशी प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५०-५१ | ३५.४९ | २०.१ | ५.५९ | ४६ | २.४ | १.८ |
| १९५५-५६ | ५०.११ | २५.० | ९.३३ | ९६ | ४.० | ३.३ |
| १९६०-६१ | ७८.२६ | ३५.० | १८.७६ | १२.५ | ७.४ | ५.४ |
| १९६५-६६ | १२५.५४ | ४७.६ | ३५.८७ | २०.७ | १४.२ | ९.१ |
| १९७०-७१ | २६८.६० | ६८.६ | ६७.८५ | ३३.० | २२.५ | १२.२ |
| १९७५-७६ | ३३४.८४ | ९७.२ | १२६.२० | ५५.७ | ३५.८ | १६.९ |
| १९८०-८१ | ३८५.१५ | १११.७ | १८४.५६ | ७४.० | ५२.८ | २२.६ |

आधार : शिक्षण आणि समाजकल्याण मंत्रालय, पाच पंचवार्षिक योजनेतील शिक्षण (१९७४-७९)

स्त्रीच्या व स्त्रीशिक्षणाच्या विकासासाठी स्वातंत्र्योत्तर काळात अनेक समित्या स्थापन करण्यात आल्या. त्यामध्ये दुर्गाबाई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली स्त्रीशिक्षणावरील राष्ट्रीय समिती, हंसा मेहता यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासक्रमाविषयी समिती, एम्.भक्त वत्सलम् यांच्या अध्यक्षतेखाली मुलींच्या शिक्षणाविषयीची समिती, तसेच स्त्रियांचे सामाजिक स्थानाचे मूल्यमापन करण्यासाठी श्रीमती फुलराणी गुहा व वीणा मुजुमदार समिती यांचा समावेश होतो.

इ.स. १९५३ मध्ये माध्यमिक शिक्षणाची माहिती मिळविण्यासाठी नेमलेल्या एज्युकेशन कमिशनने स्त्रीशिक्षणासंबंधीही काही माहिती गोळा केली.होती. त्यावेळी ` घर हेच स्त्रीचे खरे कार्यक्षेत्र आहे आणि म्हणून गृहजीवनास उपयोगी पडणारे शिक्षणच मुलींना देण्यात यावे. त्यासाठी मुलांच्यापेक्षा वेगळा अभ्यासक्रम मुलींना असावा,` हा एक विचार अनेकांनी बोलून दाखविलेला होता. परंतु समाजसुधारकांनी हा विचार झुगारून दिला. शिक्षणाची सर्व क्षेत्रे मुलींच्यासाठी मुली केली. शहराप्रमाणे ग्रामीण भागातूनही स्त्रीशिक्षण विकसित होणे आवश्यक होते.

आणखी एका निराळ्या दृष्टीच्या शैक्षणिक प्रयोगाचा उल्लेख आवर्जून केला पाहिजे. श्री. पूर्णिमा बेन, पक्वासा हांनी १९५६ मध्ये ` शक्तिदल ` नावाची संस्था स्थापन केली. ग्रामीण व शहरी स्त्रियांना इतर सामान्य ज्ञानाबरोबर लष्करी शिक्षण देण्याची योजना होती. घोड्यावर बसणे, बंदूक चालविणे, पर्वतारोहण, परेड इत्यादी बाबतीत स्त्रियांना तरबेज करण्याचा प्रयत्न असून स्त्रिया स्वतंत्र भारताच्या उत्तम नागरिक बनून आत्मरक्षण करण्याचे सामर्थ्य त्यांना प्राप्त व्हावे, ही संस्थेची प्रमुख उद्दिष्टे होती.

सन १९४७ ते १९६६ ह्या काळातील नमूद करण्यासारखे दुसरे शिक्षणप्रयोग पूर्वप्राथमिक क्षेत्रात, ग्रामीण शिक्षणक्षेत्रात व प्रौढ शिक्षणक्षेत्रात झाले.

श्रीमती ताराबाई मोडक ह्यांनी बोर्डी व कोसबाड येथे ग्रामीण बालवाड्या व त्यासाठी ग्रामीण बालशिक्षणाची अध्यापन प मंदिरे काढली व प्रयोग करून त्यात-हेचे शिक्षण देण्यास सुरुवात केली.

कस्तुरबा स्मारक ट्रस्टने ग्रामसेविका वर्ग काढले.

दुर्गाबाई देशमुख ह्यांनी प्राथमिक व माध्यमिक शालान्त परीक्षेचा अभ्यास दोन वर्षांत तयार करून ह्या परीक्षा प्रौढ स्त्रियांना हस्तगत करून घेण्यासाठी ` कन्डेन्स्ड कोर्स ` काढण्याचा प्रयोग सुरू केला.

या सर्व प्रयोगांचे लक्ष ग्रामसुधारणा, ग्रामशिक्षण हे होते. तथापि अप्रत्यक्षपणे या प्रयोगांचा स्त्रीशिक्षणाच्या विकासाला आणि त्यांच्या सामाजिक विकासातील सहभागाला मदत झाली हे नाकारता येणार नाही.

शिक्षण आयोग (१९६४-६६) या आयोगाने मुलींच्या शिक्षणाच्या प्रसारासाठी खूप त्वरेने जोरदार प्रयत्न करण्याची शिफारस केलेली असून वीस वर्षांत त्यांचे निम्न माध्यमिक पातळीवरील मुलांशी प्रमाण २:१ व उच्च माध्यमिक पातळीवरील प्रमाण ३:१ होईल हे पाहावे असे म्हटले आहे.

तसेच मुलींच्यासाठी स्वतंत्र शाळा काढून त्यांच्यासाठी वसतिगृहे, शिष्यवृत्या, अंशवेळ अभ्यासक्रम व व्यावसायिक अभ्यासक्रम यांची योजना

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

करणाऱ्या गोष्टींवर अधिक भर योजना द्यावा असेही या आयोगाने म्हटले आहे.[१०]

मुली अधिक अभ्यासू व क्रियाशील व्हाव्यात म्हणून नैतिक, आध्यात्मिक मूल्यांच्या शिक्षणावर भर द्यावा व त्यासाठी शालेय वेळापत्रकात एक दोन तास मुद्दाम दिले पाहिजेत अशी खास शिफारस या आयोगात होती.

मुले आणि मुली यांच्या अभ्यासक्रमातील फरक दर्शविताना या आयोगाने केलेली पुढील शिफारस स्वागतार्ह अशीच आहे.

" राष्ट्रीय स्त्रीशिक्षण मंडळाने शालेय अभ्यासक्रमात लिंगभेदावर आधारलेला वेगळेपणा असू नये अशी जी शिफारस केली आहे ती आम्ही स्वीकारार्ह मानतो. गृहजीवनशास्त्र हा विषय कुणालाही सक्तीचा न करता तो ऐच्छिक ठेवावा. संगीत व इतर ललित कलांच्या अभ्यासाची अधिक सोय केली जावी. त्याच बरोबर गणित व शास्त्र यांच्या अभ्यासास उत्तेजन दिले जावे."

सद्यःस्थिती :

स्वातंत्र्यानंतर स्त्रियांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे हा एकच महत्वाचा कार्यक्रम शिक्षण विभागात होता. १९५१ ते १९८१ च्या दरम्यान स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ७.९३ टक्क्यांवरून २४.८८ टक्क्यांपर्यन्त वाढले होते. तथापि संख्येचा विचार केला तर निरक्षर स्त्रियांची संख्या १५८.७ लक्षावरून २४१.७ लक्षांपर्यन्त (आसाम सोडून) वाढली होती. एकूण निरक्षर लोकसंख्येत ५७ टक्के स्त्रिया आहेत. तर शाळेत नाव न नोंदविलेल्या मुलांपैकी ७० टक्के मुली आहेत. आतापर्यन्त

याबाबतीत प्रयत्न करूनसुध्दा स्त्रियांच्या समानतेबाबत पुरेसा सहभाग घेण्यात शिक्षणपध्दती असमर्थ ठरली आहे.[११]

आज २१ व्या शतकाकडे वाटचाल करीत असतानासुध्दा भारतीय स्त्रियांची परिस्थिती केविलवाणी आहे. स्त्रियांनी वर्षानुवर्षे विषमतेचा जाच सहन केला. केवळ साक्षरतेचा विचार केला, तरीसुध्दा ही विषमता जाणवते.

स्त्रियांची शैक्षणिक प्रगती होत असली तरी पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण इ.स. १९८१ मध्येही जवळजवळ निम्म्याइतके आहे.

सारणी क्र. २.४

भारतातील साक्षरतेचे प्रमाण

| वर्ष | एकूण | पुरूष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| १९०१ | ५.३६ | ९.८३ | ०.६० |
| १९११ | ५.९२ | १०.५६ | १.०६ |
| १९२१ | ७.१५ | १२.२१ | १.८१ |
| १९३१ | ९.५० | १५.६९ | २.९३ |
| १९४१ | १५.१० | २४.९० | ७.३० |
| १९५१ | १५.६७ | २४.९५ | ७.९३ |
| १९६१ | २४.०२ | ३४.४४ | १२.९५ |
| १९७१ | २९.४५ | ३९.४५ | १८.६९ |
| १९८१ | ३६.१७ | ४६.७४ | २४.८८ |

(१९४१ पर्यन्तचे आकडे विभाजनपूर्व भारताचे आहेत.)

स्त्रियांचा शैक्षणिक दर्जा अजूनही जितका चांगला असायला हवा, तितका नाही. त्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण हे सर्वसाधारणपणे पुरुषांमधील साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा कमी राहिले आहे. सन १९७१ च्या खानेसुमारी प्रमाणे २५ वर्षांवरील वयोगटातील स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण हे फक्त १३.४ प्रतिशत इतकेच आहे.

२) इयत्ता पहिली ते चौथी (वयोगट ६ ते ११ वर्षे) मध्ये दाखल होण्याचे मुलींचे प्रमाण ६६.४ प्रतिशत इतके आहे. तर मुलग्यांमधील हेच प्रमाण १००.२ प्रतिशत इतके आहे.

३) इयत्ता पहिली ते पाचवीमधील मुलींचे गळतीचे प्रमाणही खूप मोठे आहे. अलिकडे करण्यात आलेल्या एका अभ्यासात असे दिसून आले की, ग्रामीण भागातील, त्याचप्रमाणे समाजाच्या शोषित वर्गांमधून आलेल्या मुलींमध्ये गळतीचे प्रमाण विशेष जास्त आहे. ह्या अभ्यासाप्रमाणे इयत्ता पहिली आणि दुसरीमध्ये हे प्रमाण ४२.८५ प्रतिशत इतके जास्त आहे.

४) इयत्ता ६ वी आणि ८ वी च्या संदर्भात बोलायचे झाल्यास शाळेत शिकणाऱ्या मुलांचे आणि मुलींचे त्यांच्या वयोगटातील (११ ते १४ वर्षे) प्रमाण अनुक्रमे ४८.३ प्रतिशत आणि २२.२ प्रतिशत इतके आहे.

५) माध्यमिक पातळीवर म्हणजे इयत्ता ९ वी ते ११ वी-१२ वी मध्ये शिकणा-या मुलींचे त्यांच्या वयोगटातील (१४ ते १७ वर्षे) प्रमाण फक्त १२ प्रतिशत आहे. तर त्याच वयोगटातील मुलांचे प्रमाण ३१ प्रतिशत इतके आहे.

६) माध्यमिक शालांत परीक्षेच्या पुढील शिक्षण घेणा-या मुलींचे त्यांच्या वयोगटातील (१७ ते २३ वर्षे) प्रमाण फक्त २.३ प्रतिशत इतके आहे, तर त्याच वयोगटातील मुलांचे प्रमाण ७.५ प्रतिशत इतके आहे.[१२]

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ व स्त्री शिक्षण :

लक्ष्य :

अ) १९९० पर्यन्त मुलींना, विशेषत: प्राथमिक शिक्षण देणारा, टप्पाटप्पा पण कालबध्द कार्यक्रम व १९९५ पर्यन्त उच्च प्राथमिक शिक्षण देणारा कार्यक्रम.

ब) १९९५ पर्यन्त १५ ते ३६ वयोगटातील स्त्रियांना (ज्यांची संख्या अंदाजे ६.८ कोटी आहे) प्रौढ शिक्षण देणारा टप्प्याटप्पयाचा व कालबध्द कार्यक्रम.

क) स्त्रियांचा व्यावसायिक, तांत्रिक, धंदेवाईक तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या व उदयोन्मुख तंत्रज्ञानाकडे वाढता प्रवेश.

ड) स्त्रियांच्या समानतेबाबत मदत होईल, अशा शैक्षणिक कार्यक्रमांचे सिंहावलोकन व पुनर्रचना आणि उचित अशा विभागांची निर्मिती.

स्त्रियांच्या दर्जात मूलभूत बदल घडवून आणण्यासाठी शिक्षणाचा उपयोग केला जाईल, असा विचार राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात केला आहे.

<u>स्त्रीविषयक अभ्यास</u> :

स्त्रीविषयक अभ्यासात चार बाजू असतील. अध्यापन, संशोधन, प्रशिक्षण व विस्तार.

१) <u>अध्यापन</u> -

अ) पदवी न मिळविलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने सुरू करावयाच्या आधारभूत कार्यक्रमात स्त्रियांचा दर्जा व त्यांची भूमिका या विषयांशी निगडित असणाऱ्या महत्वाच्या समस्यांचा समावेश असेल.

ब) निरनिराळ्या शाखांच्या अभ्यासक्रमात स्त्रीविषयक विविधांगांचा समावेश असेल.

क) स्त्रीपुरूषवाचक ठराविक साच्याचे पाठ, पुरूषांचे श्रेष्ठत्व व स्त्रियांचे कनिष्ठत्व व्यक्त करणारे पाठ्यपुस्तकातील पाठ वगळले जातील.

२) <u>संशोधन</u> -

अ) ह्या दक्षेत्रातील ज्ञानाच्या प्रगतीसाठी व माहितीचा पाया विस्तृत करण्यासाठी महत्वपूर्ण अशी निवडलेली क्षेत्रे व विषय, यामध्ये संशोधन करण्यास उत्तेजन दिले जाईल.

ब) अपायकारक होण्यास कारणीभूत झालेली, अस्तित्वात असलेली तंत्रे व साधने यांचे सम्यक् मूल्यमापन केले जाईल. जरूर वाटल्यास संशोधन पध्दतीत सुधारणा केली जाईल.

क) अभ्यासक्रम पुनर्रचनेसाठी कृतिसत्रे घेतली जातील.

४) विस्तार -

अ) ज्या कार्यक्रमांनी समाजाचा प्रत्यक्ष फायदा होईल व स्त्रियांना अधिकार प्राप्त होतील असे कार्यक्रम घेण्यास शैक्षणिक संस्थांना उत्तेजन देण्याबाबत सुचविले आहे.

ब) स्त्रियांचे अधिकार हेच ज्यांचे सरळ लक्ष्य आहे अशा विकासात्मक कार्यक्रमांची प्रत्यक्ष कार्यवाही करण्यात येईल. असे विकासात्मक कार्यक्रम म्हणजे, प्रौढशिक्षण, जाणीव जागृती, साक्षरता, कायद्यांचे प्राथमिक ज्ञान इत्यादी होत.

लक्ष्य आणि कार्यपद्धतीची अंमलबजावणी यामध्ये प्रामुख्याने पुढील गोष्टी असतील.

१) विविध अभ्यासक्रमातील भाग म्हणून स्त्रीशिक्षणास उत्तेजन देणे व स्त्रियांच्या विकासास मदत करण्यासाठी शैक्षणिक संस्थांना मदत करण्यासाठी शैक्षणिक संस्थांना निरनिराळे कृतियुक्त कार्यक्रम घेण्यासाठी उत्तेजन देणे.

२) व्यावसायिक, तांत्रिक व धंदे शिक्षणात स्त्रियांच्या प्रवेशास अधिक संधी देणे.

३) अपेक्षित लक्ष्य गाठण्यासाठी गतिमान व्यवस्थापनाचा आकृतिबंध निर्माण करणे.

## २.८ समारोप :

प्रस्तुत प्रकरणात स्त्रिशिक्षणाचा वैदिक काळापासून सध:स्थितीपर्यन्तचा अगदी थोडक्यात आढावा घेतला आहे. प्रस्तुत संशोधनाला या आढाव्याचा ऐतिहासिक पार्श्वभूमी म्हणून उपयोग व्हावा. यानंतर या विषयाशी संबंधित असे जे संशोधन झाले आहे त्याचा आढावा घेण्यासाठी पुढील प्रकरणाकडे वळूया. (प्रकरण क्रमांक तीन - संशोधनविषयाशी संबंधित संशोधित साहित्याचा आढावा).

## संदर्भ

१) बाबर, सरोजिनी, " स्त्रीशिक्षणाची वाटचाल, " महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय, पृ.३.

२) तत्रैव, पृ.३.

३) तत्रैव, पृ.५.

४) तत्रैव, पृ. ५.

५) हिंगणे स्त्रीशिक्षण संस्थेचे माणिक महोत्सव प्रकाशन, " भारतीय स्त्री," पृ.४४.

६) तत्रैव, पृ. ४४.

७) तत्रैव, पृ. ४५.

८) बाबर, सरोजिनी, " स्त्री शिक्षणाची वाटचाल," महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालय, पृ. ११६.

९) गवाणकर, रोहिणी," मराठी स्त्रीशक्तीचे राजकारणी रूप, " पुणे : आदित्य प्रकाशन, पृ. १३.

१०) Naik J.P., "The main recommendations of the report of the education commission," New Delhi : National Council of educational research and training, p. 45.

११) नागपुरे व.रा. (प्रकाशक), " राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, १९८६ शैक्षणिक आव्हानाकडून कृति कार्यक्रमाकडे," पुणे : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.

१२) उपाध्ये दीपक (अनुवादक)," शिक्षण आणि समाज," पुणे : इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन, पृ. ४७.